# लोकमान्य टिळक आणि बॅरिस्टर व्ही. व्ही. ओक स्मृती चित्रकला प्रदर्शन

शब्द अपुरे पडले की कलेचा जन्म होतो

ज्येष्ठ चित्रकार शरदचंद्र तरडे यांचे प्रतिपादन

जेव्हा शब्द अपुरे पडायला लागतात, तेव्हा कलेचा जन्म होतो. साकारण्यात येणाऱ्या प्रत्येक चित्रात वेगळा विचार असतो. आशयही वेगळा असतो. कलाकारांच्या मनात विचारांची घालमेल सुरू झाली की, चित्र आकाराला येते. मनातील विचारांतून मुक्त होणे म्हणजे चित्र पूर्णत्वाला जाणे. असे मत ज्येष्ठ चित्रकार शरदचंद्र तरडे यांनी सोमवारी व्यक्त केले. 37 व्या अखिल भारतीय लोकमान्य टिळक आणि बॅरिस्टर व्ही. व्ही. ओक स्मृती चित्रकला प्रदर्शनाचा पारितोषिक वितरण सोहळा तरडे यांच्या हस्ते नुकताच टिळक स्मारक मंदिरात पार पडला. त्या वेळी ते बोलत होते. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक, कुलगुरू डॉ. गीताली टिळक, ज्येष्ठ चित्रकार डॉ. सुभाष पवार या वेळी उपस्थित होते. तरडे म्हणाले, चित्र हे मानवाचे मूळ आहे. मानवी जीवनात चित्र आधी आले, त्यानंतर भाषेचा उदय झाला. अगदी प्राचीन काळापासून भावना पोहचविण्याचे माध्यम म्हणून कलेकडे पाहिले जाते. भावना पोहचविण्याचे माध्यम कला आहे.

कला वरवर साकारून चालत नाही, तर ती मनापासून साकारावी लागते. त्यात जीव ओतावा लागतो. तेव्हा कुठे मनासारखे चित्र कागदावर उमटत असते, असेही तरडे यांनी नमूद केले.

मनात विचार सुरू झाले की, चित्र आकाराला येत असते. मुळात विचार म्हणजेच चित्र असते. ज्या वेळी विचार संपतात त्यावेळी चित्र पूर्ण झालेले असते. तसेच कलाकारांचीही मनातील विचारापासून मुक्तता झालेली असते. कोणतेही चित्र वाईट नसते. काही वेळी विचार आणि प्रयत्न कमी पडतात. त्यामुळे कलाकारांनी सतत कला सादर करत राहावी, शेवटी कलाच तुम्हाला यशाच्या शिखरावर नेते असा विश्वासही शरदचंद्र तरडे यांनी व्यक्त केला.

कलाप्रदर्शनातील कलाकार गटातून लोकमान्य टिळक पुरस्कार गौरव साखरे, जयंतराव टिळक पुरस्कार यश चावरडोळ, बॅरिस्टर व्ही. व्ही. ओक पुरस्कार अरविंद महाजन, इंदुताई टिळक पुरस्कार धनराज पाटील, गौरीताई टिळक पुरस्कार कैलास शंकरपेल्ली, कै. रावसाहेब गुरव पुरस्कार उदय करंजकर, सुधाकर बोधे उत्तेजनार्थ पुरस्कार राहुल वाघ, शाम भुतकर, चित्रकार अरूण पाथरे स्मरणार्थ उत्तेजनार्थ पुरस्कार नितीन बोर्डे यांना, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह कुसुमावती हिरा व ज्योती कदम यांना देण्यात आला.

विद्यार्थी गटातून टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुरस्कार वैभव गडकरी, सुजल निवते, सृष्टी अपराज यांनी मिळविला. श्रेयश गावडे यांना सुधाकर बोधे पुरस्कार, प्रियांका खालडकर यांना सत्यम सेल्स अँड सर्विसेस पुरस्कार, राजेश्री केदारी यांना रावसाहेब गुरव स्मृती पुरस्कार, विवेक आगळे यांना स्वामी डेव्हलपर्स पुरस्कार, विवेक देशमुख व उदमले पवार

यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात आले. या वेळी देणगीदार व बक्षिसांचे पुरस्कर्ते यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ. मंजिरी भालेराव यांनी मनोगत व्यक्त केले. अनुजा पालकर यांनी सूत्रसंचालन केले. संजय ऐलवाड यांनी आभार मानले.

कला हे विचारांचे माध्यम कला हे प्रत्येक कलाकार आपल्या कल्पनेनुसार मांडत असतो. त्यामुळे कला हे विचारांच्या आदान प्रदानाचे प्रभावी माध्यम आहे. प्रत्येक कलेचा रंग वेगळा असतो. चित्रांच्या आकारांची भाषा वेगळी असते. त्यामुळे कलाप्रेमींनी कलेची भाषा समजून घेणे गरजेचे आहे. चित्रकलेचा प्रचार व प्रसार झाला पाहिजे. याच उद्देशाने अखिल भारतीय लोकमान्य टिळक व बॅरिस्टर व्ही. व्ही. ओक स्मृती चित्रप्रदर्शन भरविले जाते. या व्यासपीठावरून चित्रकलेला प्रोत्साहन मिळावे. चित्रकारांना व्यक्त होण्याचे बळ मिळावे, हीच आमची भूमिका आहे. दरवर्षी या चित्रप्रदर्शनाला देशभरातून प्रतिसाद वाढत चालला आहे. त्यामुळे चित्रप्रदर्शन आयोजनाचा हेतु साध्य होत असल्याचे टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. गीताली टिळक यांनी सांगितले.